लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यातला प्रचार आज संध्याकाळी संपेल. या टप्प्यात सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून ५७ लोकसभा मतदारसंघात येत्या शनिवारी मतदान होणार आहे.

लोकसभा निवडणुकीच्या सर्व टप्प्यांची मतमोजणी येत्या ४ जून रोजी होईल. तसंच आंध्रप्रदेश आणि ओदिशातल्या विधानसभा निवडणुकांची आणि देशभरातल्या विविध राज्यात झालेल्या विधानसभा पोटनिवडणुकांची मतमोजणी देखील ४ जून रोजी होईल. अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम विधानसभा निवडणुकीची मतमोजणी २ जून रोजी होणार आहे.

**<><><><><>**

नैर्ऋत्य मोसमी पाऊस आज केरळमध्ये दाखल झाला असून, ईशान्य भारताच्या बहुतेक सर्व भागात तो पुढे सरकल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. यंदा मान्सून आपल्या १ जून या नेहमीच्या वेळेपूर्वीच दोन दिवस दाखल झाला आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत कर्नाटक, तामिळनाडू आणि पुडुचेरीसह दक्षिण भारताच्या उर्वरित भागात मान्सूनच्या आगमनासाठी अनुकूल परिस्थिती असून, पश्चिम बंगाल आणि सिक्कीमच्या डोंगराळ प्रदेशासह, ईशान्य भारताच्या सर्व भागांमध्ये तो पोहोचेल, असं हवामान विभागाचे महासंचालक मृत्युंजय मोहपात्रा यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं २०२४-२५ या चालू आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्था सात टक्के दरानं वाढेल, असा अंदाज वर्तवला आहे. रिझर्व्ह बँकेनं आज चालू आर्थिक वर्षाचा अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालात एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीतील मध्यवर्ती बँकेच्या कामकाजाचा समावेश केला

आहे. १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ मध्ये संपलेल्या आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्था गतिमान आणि अधिक मजबूत झाल्याचं रिझर्व्ह बँकेच्या ताज्या अहवालात नमूद केलं आहे. यामुळे जीडीपीतही वाढ झाली असून तो ७ पूर्णांक ६ दशांश टक्के इतका झाला आहे. २०२२-२३ या आर्थिक वर्षात जीडीपी दर ७ टक्के इतका होता. सलग तीन वर्षे जीडीपीचा दर सात टक्के किंवा त्याहून अधिक आहे.

<><><><><>

मराठवाड्यात भीषण दुष्काळाची परिस्थिती असल्यामुळे जनावरांना दावणीपर्यंत चारा उपलब्ध करून द्यावा, शेतकऱ्यांना कर्जमुक्त करावं, बँकाकडून सुरू असलेली कर्जवसुली थांबवण्यात यावी, अशी मागणी विधानसभेतले विरोधीपक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. काँग्रेस पक्षाने राज्यात काढलेल्या दुष्काळ पाहणी दौऱ्यावर असताना छत्रपती संभाजीनगर इथं ते वार्ताहारांशी बोलत होते. शेतकऱ्यांना मोफत वीज, बियाणे, खते उपलब्ध करून द्यावेत असेही त्यांनी सांगितलं.

दरम्यान, मराठवाड्यात दुष्काळ पडलेला असताना राज्याचे कृषीमंत्री परदेश दौऱ्यावर जातात. या मंत्र्यांसह राज्य शासनाला शेतकऱ्यांचं काही देणघेणं राहिलेलं नाही. त्यांचं फक्त टेंडरवरच लक्ष असल्याची टीकाही यावेळी वडेट्टीवार यांनी केली.

<><><><><>

मुंबईत मध्य रेल्वेच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि ठाणे रेल्वे स्थानकांत प्लॅटफॉर्मचं रुंदीकरण आणि विस्ताराच्या कामासाठी आज मध्यरात्री पासून विशेष मेगा ब्लॉक घेतला जाणार आहे. हे काम रविवारी दुपारपर्यंत चालणार

आहे. रुंदीकरणाच्या कामासाठी ठाणे इथं ६३ तासांचा तर सीएसएमटी स्थानकात ३६ तासांचा मेगा ब्लॉक घेतला जाणार आहे.

मेगा ब्लॉकमुळे मध्य रेल्वेच्या २३ टक्के, म्हणजे एकूण ९५६ लोकल फेऱ्या आणि ७२ मेल-एक्स्प्रेस रद्द होणार आहेत. अनेक लांब पल्ल्यांच्या काही गाड्या रद्द केल्या आहेत तर कोकणात जाणाऱ्या आणि येणाऱ्या गाड्या पनवेल स्थानकातून सुटतील. उपनगरीय रेल्वे फेऱ्या अंशतः रद्द केल्या जाणार आहेत. शनिवारी, १ जून रोजी रविवारच्या वेळापत्रकानुसार उपनगरी गाड्या चालवण्यात येणार आहेत. यामुळे रेल्वे स्थानकांतील गर्दी टाळण्यासाठी शक्य असल्यास रेल्वे प्रवास टाळा, असं आवाहन मध्य रेल्वे प्रशासनानं केलं आहे. हे काम पायाभूत सुविधांच्या सुधारणा आणि फायद्यासाठी आवश्यक असल्यानं प्रवाशांनी सहाकार्य करावं, अशी विनंती मध्य रेल्वे प्रशासनानं केली आहे.

**<><><><><>**

डोंबिवलीत अमुदान कंपनीच्या कारखान्यात झालेल्या स्फोटप्रकरणी मलय मेहता आणि स्नेहा मेहता या दोघा संचालकांना कल्याणच्या न्यायालयानं ३१ मे पर्यंत पोलिस कोठडी दिली आहे. उल्हासनगर गुन्हे शाखेनं या दोघांना काल न्यायालयात हजर केलं होतं.

**<><><><><>**

हिंगोली जिल्ह्यात नांदेड-औंढा नागनाथ मार्गावरच्या टोल नाक्या जवळ आज सकाळी एक प्रवासी बस उलटून झालेल्या अपघातात १८ जण जखमी झाले. बस चालकानं ब्रेक लावल्यावर टायर फुटल्यामुळे हा अपघात झाला.

**<><><><><>**

भंडारा इथं जिल्हा सामान्य रुग्णालयात उष्माघातावर उपचार घेणाऱ्या एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे. रुग्णालयात उष्माघाताचे पाच रुग्ण दाखल असल्याचं रुग्णालय प्रशासनानं सांगितलं आहे.

**<><><><><>**

भंडारा जिल्ह्यात तुमसर तालुक्यातल्या चिखला गावात रात्रीच्या वेळी  बिबट्याचा वावर दिसून आला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली आहे. काही दिवसांपूर्वी बछड्यासह बिबट्याचं दर्शन झाल्याचं नागरिकांनी सांगितलं.

**//<><><><><>//**